# ऐक हाक स्वत:ची......



धावपळीच्या या दुनियेत नाही वेळ कुणाला |
जमले पाहिजे आता तुला स्वत:शी बोलायला ||
आयुष्याच्या या स्पर्धेत प्रत्येकाला ओढ लागली जिंकण्याची |
तूही घे योग्य निर्णय  ऐकुन हाक स्वत:ची ||

उगवणारा सूर्य तुझ्यासाठी रोज नवीन संधी आणतोय |
आणि मावळताना खूप काही शिकवून जातोय ||
गरज आहे तुला त्या संधी ओळखण्याची, प्रत्यक्षात आणण्याची |
आणि त्यासाठी तरी तू ऐक हाक स्वत:ची ||

competition च्या या जगात कुणीही perfect नसत |
वेळ दाखवता दाखवता कधीतरी घड्याळही चुकत असत ||
जिंकल्यासारखे वाटल्यावर माधूनच निसटून जातो डाव |
केलेली planning चौपट होऊन बसते राव ||

अशावेळी तू धीर मात्र सोडू नको |
नाशिबाच्या नावाने रडू नको ||
ज्यावेळी खोल ठरतात दावे, कळत नाही कुठे जावे |
त्यावेळी गरज असते स्वत:चाच मित्र बनण्याची |
आणि त्यासाठी तरी आता तू ऐक हाक स्वत:ची ||

जगासाठी कसाही असला तरी स्वत:साठी ideal बन |
कितीही कठीण परिस्थिति आली तरी स्वत:ला एकदा लढ म्हण ||
हिंमत ठेव प्रत्येक अडथळा पार करण्याची |
आणि त्यासाठी मात्र ऐक हाक स्वत:ची ||

कंटाळा आल्यावर स्वत:चा मनोरंजक तू बन |
संगळ संपल्यासारख वाटल्यावर स्वत:ला motivate ही तूच कर ||
ही तर सुरुवात आहे तू फक्त ठेव तयारी लढण्याची |
आणि त्यासाठी मात्र ऐक हाक स्वत:ची ||

एकट वाटायला लागलं की त्या निरभ्र आकाशाकडे बघ |
सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळायला लागतील मग ||
सांगतय ते जणू मी आहे तुझ्या पाठीशी |
तू फक्त कुशीत घेऊन स्वप्न तयारी ठेव उडण्याची |
आणि त्यासाठी मात्र ऐक हाक स्वत:ची ||

छोट्या छोट्या यशानंतर सुध्दा ताब्यात ठेव तुझे मन |
स्वत:चे स्वप्न जगू शकशील ऐवढा तरी मोठा बन ||
तयारी ठेव स्वत:च्या, समाजाच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची, आपल्या परिवाराला सांभाळण्याची |
आणि त्यासाठी तरी आता ऐक हाक स्वत:ची ||
ऐक हाक स्वत:ची....

- हर्षदा प्रकाश बोरसे